# प्लेटॉर रांजणगाव वाविप्र

**प्लेटॉरचे प्रवर्तक कोण आहेत?**
ब्रीक ईगल आणि संगम ग्रुप

**हा प्रकल्प कुठे स्थित आहे?**
प्लेटॉर रांजणगाव : गट क्र. 697, गाव : कोरेगाव, शिरूर तालुक्याजवळ, जि. पुणे

**प्रकल्पाची/टाऊनशिपची संकल्पना काय आहे?**
प्लेटॉर भारतभरात जागतिक दर्जाच्या टाऊनशिप्स बांधत आहे ज्या परवडण्याजोग्या, धारणीय (टिकाऊ) असतात आणि हजारो बालपणे समृद्ध करण्यासाठी सुसज्ज असलेली बालकेंद्री टाऊनशिप्स निर्माण करून तरुण भारतीयांना संधी देऊ करतात. भारत हा असा देश आहे जो विकसित होण्यासाठी भविष्याकडे डोळे लावून बसला आहे, आणि प्लेटॉरमध्ये आम्ही आमच्या मुलांना यशस्वी होण्याची प्रत्येक संधी देतो.

**प्लेटॉरचे ध्येय काय आहे?**
मुलांची एकूण जीवनशैली सुधारणारी सीमाचिन्हं निर्माण करणे. स्मार्ट हाऊजिंगची व्याप्ती भारतात वाढवणे, रु.10 ते 20 लाखाच्या दरम्यान आपल्या देशातील प्रत्येक कुटुंबासाठी एक घर मिळवून देण्याची खात्री करणे. पुढील पाच वर्षांत 16 दशलक्ष चौरस फुटांवर स्थावर संपदेच्या विकासाचे बांधकाम पूर्ण करणे.

**रांजणगावजवळ कुठल्या सुविधा आहेत?**
0.8 किमी रांजणगाव एमआयडीसी, 6 किमी – अथर्व स्पेशालिटी हॉस्पिटल, शिक्रापूर, 15 किमी – संजीवनी प्रतिष्ठान कॉलेज, कुरुंद.

**या क्षेत्रात रोजगार निर्मितीची क्षमता किती आहे?**
या ठिकाण रोजगार निर्मितीची कमालीची क्षमता आहे. कारण प्रकल्पापासून केवळ 0.5 किमी अंतरावरच रांजणगाव एमआयडीसी शहर आहे. यामध्ये अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक इत्यादींसाठी खास वेगळे पार्क्स आहेत, तेव्हा तुमच्या जवळच असलेल्या उत्तम नोकऱ्यांमुळे तुम्हाला फार दूर जावं लागणार नाही.

**ही बांधकाम पूर्ण झालेली मालमत्ता आहे का, जर असेल तर तपशील द्या, नसेल तर बांधकाम कधी सुरु होईल?**
बांधकाम डिसेंबर 2014 पासून सुरू होईल.

**सदनिकेचे क्षेत्र किती आणि खर्च किती?**
आमच्याकडे 1बीएचके सदनिका आहेत. चटई क्षेत्र 275 चौ. फूट आहे. बांधकाम क्षेत्र (जे विक्रीयोग्य क्षेत्र आहे) 371 चौ. फूट आहे. विक्रीयोग्य क्षेत्राचा दर प्रति चौ. फूटावर रु. 2300/– आहे. सदनिकेचा खर्च, शहर विकास शुल्क रु 1,46,699/– धरून 9,99,999/– एवढा आहे.

**चटई क्षेत्र/बांधकाम क्षेत्र म्हणजे काय?**
चटई क्षेत्र हे भिंतींच्या चौकटीत बंदिस्त असलेले किंवा प्रत्यक्ष वापराचे आणि मोजमापयोग्य क्षेत्र आहे. बांधकाम क्षेत्र म्हणजे चटई क्षेत्र आणि बाह्य व अंतर्गत भिंतींची जाडी आणि लॉबी, लिफ्टची जागा, जिना, इत्यादी सामाईक क्षेत्रांचा प्रमाणानुसारचा भाग यांची बेरीज.

**चटई क्षेत्रावरील भारण किती आहे?**
भारण 35% आहे.

**एवढ्या चांगल्या किंमतीमध्ये प्लेटॉर परवडणारी गृहनिर्मिती कसे देऊ करते?**
आम्हाला परवडणारी घरे देऊ करणे प्लेटॉर मध्ये शक्य आहे ते मोठ्या प्रमाणातील उत्पादनामुळे आणि आधुनिक बांधकाम प्रक्रियांमुळे.

**मोठ्या प्रमाणावर बुकींग केल्यावर काही सूट मिळेल का?**
उत्तर : नाही, हा एक सामाजिक उपक्रम आहे, त्याच्या युनिट्सची किंमत आवाक्यात असावी अशी ठेवण्यात आली आहे.

**पैसे भरण्याचे वेळापत्रक कसे आहे?**
पैसे भरण्याचे वेळपत्रक बांधकामाशी खालीलप्रमाणे निगडित आहे :

| **जी+7 इमारत** | **%प्रमाणे** | **जी+4 इमारत** | **%प्रमाणे** |
|---|---|---|---|
| बुकींग | 20 | बुकींग | 20 |
| पायाच्या बांधकामाला सुरुवात | 15 | पायाच्या बांधकामाला सुरुवात | 15 |
| 1ल्या स्लॅबची पूर्तता | 15 | 1ल्या स्लॅबची पूर्तता | 15 |
| 3ऱ्या स्लॅबची पूर्तता | 10 | 2ऱ्या स्लॅबची पूर्तता | 10 |
| 5व्या स्लॅबची पूर्तता | 10 | 3ऱ्या स्लॅबची पूर्तता | 10 |
| 7व्या स्लॅबची पूर्तता | 10 | 4थ्या स्लॅबची पूर्तता | 10 |
| आरसीसी बांधकामाची पूर्तता | 5 | आरसीसी बांधकामाची पूर्तता | 5 |
| वीटकाम आणि प्लास्टरची पूर्तता | 5 | वीटकाम आणि प्लास्टरची पूर्तता | 5 |
| फरशी | 5 | फरशी | 5 |
| पझेशन (ताबा) | 5 | पझेशन (ताबा) | 5 |

**ताबा मिळण्याची तारीख कोणती?**
आम्ही पहिल्या फेजचा ताबा सप्टेंबर 2016 पासून द्यायला सुरुवात करू.

**तुमच्याकडे लिफ्टच्या सुविधा आहेत का, आणि त्या किती आहेत?**
हो, जी+4 इमारतीमध्ये एक लिफ्ट आणि जी+7 मध्ये दोन लिफ्ट असतील.

**प्रत्येक मजल्यावर किती सदनिका असतील?**
प्रत्येक इमारतीमध्ये एका मजल्यावर 12 सदनिका असतील.

**पाणी पुरवठा आणि वीज पुरवठा यांचे स्रोत कोणते आहेत?**
उत्तर : आम्ही एमआयडीसीकडून पाण्याचा पुरवठा मिळवू. वीजेची पुरवठा एमएसईबीकडून असेल.

**देखभाल खर्च (मेंटेनन्स) किती असेल?**
देखभालीचा खर्च दर चौ. फूटावर सुमारे 2/– रुपये असेल. पण एकदा प्रकल्प सोसायटीकडे सुपूर्द केल्यावर सोसायटी पुढील देखभाल खर्च ठरवेल.

**इथे सामाईक डिजिटल टीव्ही कनेक्शन आहे का?**
नाही.

**आम्हाला स्वीमींग पूल, जिम्नॅशियम या सुविधा आहेत का?**
नाही.

**दोन हप्त्यांमध्ये किती कालावधी असेल?**
3 ते 4 आठवडे

**आमच्या प्रकल्पामध्ये कुठल्या सुविधा आहेत?**
1 एंट्रंस प्लाझा
2. सेंट्रल अॅव्हेन्यु (मुख्य हमरस्ता)

3. ॲम्फिथिएटर
4. ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान
5. सायकलिंग ट्रॅक
6. जॉगिंग ट्रॅक
7. ट्री कोर्ट प्लाझा
8. मुलांसाठी खेळण्याची जागा
9. क्रिकेट पिच
10. क्रिकेट पिच
11. मल्टिपर्पज कोर्ट
12. एलिमेंटरी स्कूल
13. शॉपिंग प्लाझा

**तयार सदनिका आहेत का?**
नमुना सदनिका (शो फ्लॅट) आमच्या प्लेटॉर पुणे विक्री केंद्रावर तयार आहे : एस3/ए, दुसरा मजला, द मेट्रोपोल, आयनॉक्स पुढे, बंड गार्डन मार्ग, पुणे 411001.

**शहर विकास आकारण्या कोणत्या आहेत?**
शहर विकास आकारण्यांमध्ये प्रकल्पातील मुलभूत सोयी आणि सुविधांच्या तरतुदीचा समावेश होतो.

**मला जर सदनिका बुक करायची असेल तर डाऊन पेमेंट किती असेल?**
डाऊन पेमेंट सदनिकेच्या 20% असेल, जे आगाऊ द्यावे लागेल.

**बुकींगची प्रक्रिया काय आहे?**
- ग्राहक एन्क्वायरी फॉर्म (चौकशी अर्ज) भरतात आणि त्यानुसार सेल्स पर्सनकडून मार्गदर्शन मिळवतात.
- युनिट झाले की ग्राहकाने बुकिंग फॉर्मवर नमूद अटी आणि शर्ती वाचून चेक निर्गमित करणे तसे बुकिंग फॉर्मवर सही करणे आवश्यक असते. चेक करारनामा मूल्याच्या 20% इतक्या रकमेचा असायला हवा.
- बुकिंगसाठी भरलेल्या पैशांची पावती दिली जाईल.
- ग्राहकाने वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अटी आणि शर्ती वाचून घेणे आदर्श आहे.
- चेक वटल्यावर एक हंगामी नियतन पत्र (ॲलॉटमेंट लेटर) दिले जाईल.

**सदनिका बुक करताना मी स्वत:बरोबर कुठली कागदपत्रे बाळगायला हवी?**
उत्तर : तुम्हाला बुकींगच्या वेळी तुमचे पॅन कार्ड आणि चेकबुक बरोबर ठेवावे लागेल.

**कायमच्या ॲलॉटमेंट लेटरऐवजी हंगामी ॲलॉटमेंट लेटर का दिले जाते?**
तुमचे कर्ज मंजूर होईपर्यंत आम्ही तात्पुरते ॲलॉटमेंट लेटर देतो. तुमचे कर्ज एकदा मंजूर झाले आणि तुमच्या खात्यामध्ये रक्कम जमा झाली, की कायमस्वरूपी ॲलॉटमेंट लेटर दिले जाते.

**मी रोख रक्कम भरू शकतो का?**
रोखीने पैसे भरण्यास परवानगी नाही.

**तुम्ही एखादी कर्जाची सुविधा पुरवता का?**
नाही. पण आमच्या प्रकल्पाला अग्रगण्य बँका आणि गृहवित्त कंपन्यांची मान्यता आहे. तुम्ही त्यांच्याकडून गृहकर्जे मिळवू शकता.

**तुमच्याशी संलग्न असलेल्या बँका सोडून इतर एखाद्या बँकेकडून मी कर्ज काढू शकतो का?**
हो तुम्ही काढू शकता. पण तुम्हाला पैसे भरण्याच्या वेळापत्रकानुसार पैसे भरावे लागतील.

**मी तुमच्या बँकाकडे अर्ज का करावा?**
कारण हा प्रकल्प आधीच या बँकांकडून संमत झाल्याने तुमच्या कर्जाची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण होईल.

**कर्ज मंजूर झाले नाही तर काय?**
जर कर्ज मंजूर झाले नाही तर इतर स्रोतांकरवी ग्राहकाला वेळापत्रकानुसार पैसे भरावे लागतात.

**मी जर सदनिका रद्द केली तर रद्द करण्यासाठी शुल्क आकारण्यात येते का?**
रद्द करण्याचे शुल्क नाही पण रु 15000/– ची प्रशासन आणि दस्तऐवज आकारणी लागू होईल.

**एखादा/एखादी ग्राहक ताबा मिळण्याआधीच सदनिकेची पुनर्विक्री करू शकतो/ते का?**
हो पण त्यावेळच्या वाढीव किंमतीच्या 10% हस्तांतरण आकारणी लागू होईल.

**मी माझ्या सदनिकेची नोंदणी कधी करू शकतो/ते?**
20% बुकींगची रक्कम भरून कर्ज मंजुरीचे पत्र सादर केल्यावर.

**प्रकल्पाचे आर्किटेक्ट आणि सल्लागार कोण आहेत?**
आर्किटेक्ट हफीज काँट्रॅक्टर हे आर्किटेक्ट आहेत, आरसीसी सल्लागार श्री. पाटणे आणि एमईपी सल्लागार श्री एस एन जोशी आहेत.

**सदनिकेसाठी निर्देश कोणते आहेत?**
**फ्लोअरिंग :**
विट्रीफाईड सिरॅमिक टाईल्स, अँटिस्किड सिरॅमिक टाईल्स
स्टिल्ट लिफ्ट लॉबीसह सर्व फ्लोअर लॉबीज – मॅट फिनीश/ ग्लॉसी सिरॅमिक टाईल्स

**किचन :**
स्वयंपाकाचा ओटा एसएस सिंकसह
स्वयंपाकाच्या ओट्यावरून सिरॅमिक टाईल्स डॅडो 2’उंचीवर

**लिफ्ट:**
कोन किंवा 8 प्रवाशांची क्षमता असणारी समतुल्य

**पेंटिंग/पॉलिशिंग :**
इंटिरिअर – ओबीडी
एक्स्टिरिअर – सेमी ॲक्रिलिक
एमएस ग्रीलसाठी एनॅमेल पेंट

**पायाची रचना :**
सेस्मिक झोन 3 कॉम्प्लायंट रचना
आरसीसी रचना

**सदनिकेमधील बालकेंद्री बाबी कोणत्या आहेत?**
सदनिकांमधील भिंतीमध्ये टोकदार कोपरे नाहीत, चाईल्ड फ्रेंडली स्वीचेस; नो वेहिकल झोन (वाहन–प्रतिबंधित क्षेत्र), वाहन जाणारे रस्ते न ओलांडता उद्यानामध्ये सुरक्षित प्रवेश, सुरक्षेसाठी ग्रिल्स.

**बँकेच्या कर्जाच्या प्रक्रियेसाठी कुठली कागदपत्रे लागतील?**
मिळकतीचा पुरावा, फोटो ओळखपत्र, पत्त्याचा पुरावा यासारखी कायदेशीर कागदपत्रे आणि संबंधित बँकांनी सांगितलेली इतर कागदपत्रे.

**नोकरी करणाऱ्या ग्राहकांसाठी**

**अ – व्यक्तिगत कागदपत्रे :**

- आवेदनाचा अर्ज (पूर्ण भरलेला आणि दिनांकासह सही केलेला)
- अलिकडचा रंगीत पासपोर्ट साईज फोटो आणि त्यावरून केलेली सही.
- प्रक्रिया शुल्क चेक
- वयाचा पुरावा/फोटो ओळखपत्र (पॅन कार्ड / पासपोर्ट प्रत)
- कंपनी आयडी कार्डाची प्रत
- मालकी असल्यास निवासाचा पुरावा (मेंटेनन्स प्रत आणि वीजेचे बिल)
- भाडेकरू असल्यास निवासाचा पुरावा (लीव्ह अँड लायसेन्ससह इलेक्ट्रिसिटी बिल)

**ब – मिळकतीची कागदपत्रे :**

- कंपनी/व्यवसाय रूपरेखा (व्यक्तिगत मालकी/भागीदारी कंपनी असल्यास)
- नियुक्तीपत्र (सहा महिन्यांहून कमी वेळापूर्वीचे असल्यास)
- निश्चितीपत्र (सहा महिन्यांहून जास्त असल्यास)
- शेवटच्या 3 महिन्यांच्या वेतनपत्रिका (सॅलरी स्लिप्स) (सरकारी कर्मचाऱ्यांसाठी अस्सल पे स्लिप्स दाखवणे गरजेचे आहे)
- अलिकडचा फॉर्म 16/16ए
- 6 वेळा पगार क्रेडिट झाल्याचे दर्शविणारी 6 महिन्यांची अद्ययावत बँक स्टेटमेंट्स
- अस्तित्वातील कर्जाच्या आरटीआर प्रती/1 वर्ष बँकेतील नोंद
- अर्हतेचा पुरावा (गरज लागल्यास)
- इतर मिळकतींचा पुरावा (मालकीच्या पुराव्यासह भाडेकरार इत्यादी.)
- एलआयसी आणि गुंतवणुकीचा पुरावा (सोने/एफडी/मालमत्ता)

**स्वयंरोजगारी ग्राहकांसाठी :**

**अ – व्यक्तिगत कागदपत्रे :**

- आवेदनाचा अर्ज (पूर्ण भरलेला आणि दिनांकासह सही केलेला)
- अलिकडचा रंगीत पासपोर्ट साईज फोटो आणि त्यावरून केलेली सही.
- प्रक्रिया शुल्क चेक
- विझिटिंग कार्ड
- वयाचा पुरावा/फोटो ओळखपत्र (पॅन कार्ड / पासपोर्ट प्रत)
- मालकी असल्यास निवासाचा पुरावा (मेंटेनन्स प्रत आणि वीजेचे बिल)
- भाडेकरू असल्यास निवासाचा पुरावा (लीव्ह अँड लायसेन्स करारासह इलेक्ट्रिसिटी बिल)
- व्यवसायाचा पुरावा – मालकीचे/भाड्याचे कार्यालय (गोमास्ता परवाना, विक्रीकर नोंदणी, मालकीचा पुरावा/एलअँडएल करार, इत्यादी.)

**ब – मिळकतीची कागदपत्रे**

- कंपनी/व्यवसाय रूपरेखा
- अलिकडील 3 वर्षांचे प्राप्तिकर रिटर्न्स (सीएने शिक्कामोर्तब केलेले), भागीदारीचा विलेख, प्रायव्हेट लि कंपनी असल्यास एमअँडए
- ताळेबंद (सर्व शेड्युल्स), नफा आणि तोटा खाते, भांडवली खाते, मिळकतीची गणती
- कर भरल्याचे चलन/फॉर्म 16ए/टीडीएस प्रमाणपत्र – सालानुसार जोडा
- अलिकडील 12 महिन्यांसाठीची अद्ययावत बँक स्टेटमेंट्स (चालू आणि बचत खाती)

- ओडी/सीसी खाते असल्यास संमतीपत्राची आवश्यकता
- अर्हतेचा पुरावा (गरज लागल्यास)
- इतर मिळकतींचा पुरावा (मालकीच्या पुराव्यासह भाडेकरार इत्यादी.)
- एलआयसी आणि गुंतवणुकीचा पुरावा (सोने/एफडी/मालमत्ता)

**एनआरआय ग्राहकासाठी कायदेशीर कागदपत्रे**
**अ – व्यक्तिगत कागदपत्रे :**

- आवेदनाचा अर्ज (पूर्ण भरलेला आणि दिनांकासह सही केलेला) (एपीपी/पीओए)
- अलिकडचा रंगीत पासपोर्ट साईज फोटो आणि त्यावरून केलेली सही. (एपीपी/पीओए)
- प्रक्रिया शुल्क चेक
- वयाचा पुरावा/फोटो ओळखपत्र (पॅन कार्ड / पासपोर्ट प्रत)
- मालकी असल्यास निवासाचा पुरावा (मेंटेनन्स प्रत आणि वीजेचे बिल)
- भाडेकरू असल्यास निवासाचा पुरावा (लीव्ह अँड लायसेन्स करारासह इलेक्ट्रिसिटी बिल)
- प्रवेश आणि निकास दिनांक असलेल्या व्हिसा प्रतीसह पासपोर्ट
- कामाचा परवाना, कामाचा करार आणि नियुक्तीपत्र/सीडीसी.
- सेवायोजकाचे ओळखपत्र (लागू असल्यास लेबर कार्ड)
- एचआर ईमेल आयडी आणि कंपनी वेबसाईट.

**ब – मिळकतीची कागदपत्रे :**
- सेवायोजकाचे प्रमाणपत्र
- कंपनी रूपरेखा
- अलिकडच्या 3 महिन्यांसाठीच्या सॅलरी स्लिप्स किंवा टॅक्स रिटर्न्स (लागू असल्यास)
- ओव्हरसीज बँक खात्याचे विधान आणि भारतीय एनआरई खात्याचे विधान जे शेवटच्या सहा महिन्यांसाठीच्या पगाराची नोंद दाखवते.
- इतर मिळकतींचा पुरावा (मालकीच्या पुराव्यासह भाडेकरार इत्यादी.)
- एलआयसी आणि गुंतवणुकीचा पुरावा (सोने/एफडी/मालमत्ता)
- सर्व व्यक्तिगत (ॲप/को–ॲप) कागदपत्रांवर स्वयंसाक्षांकन.
- पॉवर ऑफ अ‍ॅटॉर्नी (मुखत्यारपत्र)